दै. सकाळ 27 डिसें. 2013

# छेडछाडीविरोधात पोलिसांत तक्रार द्या

## ज्योतिप्रिया सिंह यांचे आवाहन : थेट कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थिनींची ऐकली गाऱ्हाणी



कोल्हापूर : कमला कॉलेज येथील मुलींच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना गुलाब पुष्प देताना अपर पोलिस अधीक्षक ज्योतिप्रिया सिंह, शाहूवाडी पोलिस उपधीक्षक वैशाली माने. (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : कोणी छेडत असेल, त्रास देत असेल तर अन्याय सहन करू नका. त्याविरोधात तक्रार देण्याचे धाडस दाखवा, पोलिस तुमच्यासोबत आहेत, असे आवाहन अपर पोलिस अधीक्षक ज्योतिप्रिया सिंह यांनी विद्यार्थिनींना केले.

कमला महाविद्यालयात आज छेडछाडीविरोधात विद्यार्थिनींच्या तक्रारी समजून घेण्यासाठी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अनेक विद्यार्थिनी धाडसाने पुढे येत आपल्याला टवाळखोरांकडून होणाऱ्या त्रासाचे गाऱ्हाणे मांडले.

अपर पोलिस अधीक्षक ज्योतिप्रिया सिंह यांनी यापूर्वी महाविद्यालयावर घुटमळणाऱ्या टवाळखोरांना चांगला धडा शिकवला होता. आज सकाळी त्यांनी कमला महाविद्यालयातील मुलींच्या तक्रारी जाणून घेतल्या. बस, एसटीमध्ये वाहकांकडून चांगली वागणूक मिळत नाही, गर्दीचा फायदा घेऊन मुले छेडछाड करतात, कॉमेंटस् करतात, होस्टेलमधील रूमच्या काचा फोडतात, रस्त्यावरून जाताना मोटारसायकल आडवी घालून छेडतात, मोबाईलवर अश्लील गाणी लावतात, महाविद्यालयाच्या परिसरातील टोळके त्रास देते, अशा तक्रारी विद्यार्थिनींनी धीटाईने मांडल्या.

तक्रारी ऐकून घेतल्यानंतर

पान २ वर »

### टोळक्यांना प्रसाद

विद्यार्थिनींच्या समस्या जाणून घेतल्यानंतर अपर पोलिस अधीक्षक ज्योतिप्रिया सिंह यांनी महाविद्यालय परिसरात घुटमळणाऱ्या टोळक्यांना प्रसाद दिला. महाविद्यालयात मॅडम आल्याचे पाहून अनेकांनी तेथून पळ काढला.